**Journal of East-West Thought**
**ISSN:** ***2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2**

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार

**श्री. सुनील रमेश सपकाळे**, संशोधक, अर्थशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय, (स्वायत्त) अमळनेर

**गोषवारा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजाचे महान विचारवंत, समाजसुधारक आणि संविधान शिल्पकार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनप्रवास आणि विचार आजही समाजातील अनेक गोष्टींवर प्रभाव टाकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगविख्यात अर्थतज्ञ म्हणून ओळखले जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले उभे आयुष्य दीनदलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी,महिलांच्या कल्याणासाठी घालवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रा बरोबरच कायदा, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्र आणि जलधोरणात महत्त्वाची भूमिका बजावलेली आपल्याला दिसून येते.जलव्यवस्थापन, एक अत्यंत महत्त्वाचा घटक, जो समाजाच्या सर्व स्तरांवर परिणाम करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक न्याय, समानता आणि समावेशी विकासावर ठाम विश्वास होता. जलसंपत्ती हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि सीमित संसाधन आहे, आणि त्याचे योग्य व्यवस्थापन सामाजिक समतेच्या दृषटिकोनातून अत्यंत आवश्यक आहे. जलव्यवस्थापनासंबंधी बाबासाहेबांचे विचार केवळ तांत्रिक किंवा वैज्ञानिक दृष्टिकोनातून नाही, तर ते समाजाच्या विविध वर्गांसाठी न्याय, समावेश आणि समानता सुनिश्चित करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन मानले जाते.

**मुख्य शब्द:** जलव्यवस्थापन, आर्थिक विकास, जलनीती व धोरण, शाश्वत विकास

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दृष्टिकोनातून जल व्यवस्थापन किंवा जल धोरण हा एक महत्त्वाचा घटक होता कारण ते समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांना समान हक्क आणि संधी मिळाव्यात यासाठी नेहमी प्रयत्नशील असायचे. त्यांच्या दृष्टिकोनात, जल हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सीमित संसाधन आहे, ज्याच्या योग्य व्यवस्थापनामुळे अनेक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे होऊ शकतात. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समता आणि न्याय, शेती आणि ग्रामीण विकास, जलसंपत्तीचे संरक्षण आणि शाश्वत वापर, गरीब वर्गाच्या हक्काचे संरक्षण,मानवाधिकार आणि जीवनमान यासंदर्भात एकंदरीत समाजाची एकात्मता आणि सामाजिक समृद्धी साध्य करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जल व्यवस्थापन व जलधोरणाविषयी मांडलेले विचार आणि कार्यामुळे आधुनिक भारताच्या आर्थिक व सामाजिक निर्मितीत योगदान महत्वपूर्ण ठरते. म्हणून प्रस्तुत संशोधन पेपरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलधोरण व जल व्यवस्थापना विषयीचे विचार यांचा अभ्यास करणार आहोत.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

### उद्दिष्टे

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन विषयीचे विचार अभ्यासणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जलव्यवस्थापन विषयीचा कायदेशीर व धोरणात्मक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
3. जलव्यवस्थापन या संकल्पनेचा अभ्यास करणे.
4.जल व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी योग्य उपाययोजना सुचविणे.

### संशोधन पद्धती

सदर संशोधन लेख हा दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. दुय्यम साधन सामग्री म्हणजे विविध एजन्सीद्वारे वेगवेगळया उद्देशासाठी गोळा केलेली माहिती होय. ही माहिती विविध प्रकाशानांमधून अभ्यास पूर्ण कारणांसाठी गोळा केलेली आहे ज्यात सरकारी आणि गैरसरकारी प्रकाशने आणि अहवाल, शैक्षणिक जनरल, वर्तमानपत्र आणि विविध वेबसाइट्स इत्यादींचा समावेश आहे

### विषय विवेचन

वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत चालली आहे. तसेच, वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे जल व्यवस्थापनेवरील ताण वाढत चालला आहे. परिणामी जल व्यवस्थापन हे 21 व्या शतकातील एक प्रमुख आव्हान झाले आहे. सप्टेंबर, 2015 मध्ये, संयुक्त राष्ट्रातील भारतासह, 193 सदस्य राष्ट्रे पुढील 15 वर्षांत साध्य करावयाच्या 17 शाश्वत विकास उद्दिष्टांकरिता वचनबद्ध झालेली आहेत. सर्वांसाठी शुद्ध जल व स्वच्छता यांची सुनिश्चिती करणाऱ्या शाश्वत विकास उद्दिष्ट -6 द्वारे जल हा मुद्दा जागतिक कार्य सूचीवर ठोसपणे आला आहे आरोग्यपूर्ण जीवनमानाची स्थिती निश्चित करणे, भुकेची समस्या संपुष्टात आणणे, आर्थिक वाढ व इतर उद्दिष्टे सुद्धा पाण्याशिवाय साध्य करता येणार नाहीत. याशिवाय, शाश्वत उद्दिष्ट -12 (SDG 12), शाश्वत उद्दिष्ट -15 (SDG 15) आणि शाश्वत उद्दिष्ट-17 (SDG 17) या बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत अशाप्रकारे शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये मांडण्यात आलेली ध्येय साध्य करण्याकरिता जल साधन संपत्तीचा विकास व व्यवस्थापन प्रभावीपणे करणे ही बाब अत्यंत महत्त्वपूर्ण आहे म्हणूनच सदर परिपेक्ष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या जल व्यवस्थापन विषयक विचारांचा या ठिकाणी फायदा होऊ शकतो.

### जलव्यवस्थापन

"भूपृष्ठावर उपलब्ध असलेल्या पाण्याचे संरक्षण संवर्धन व विकास करणे आणि त्याची उपयुक्तता वाढविणे यासाठी पाण्याचे केलेले व्यवस्थापन म्हणजे जल व्यवस्थापन होय."

जल व्यवस्थापन म्हणजे जलस्रोतांचा उपयोग, संरक्षण आणि वितरण यांचे नियोजन, तसेच त्याच्या प्रभावी वापरासाठी एकात्मिक धोरण तयार करणे. या प्रक्रियेत जलस्रोतांचा समर्पक वापर, जास्तीत जास्त कार्यक्षमतेने जलाचा वापर, आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलस्रोतांचे संरक्षण यावर भर दिला जातो. जल व्यवस्थापनाच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये हे समाविष्ट आहे:


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1. **जलाचा कार्यक्षम वापर:** जलाच्या उपलब्धतेचा सर्वोत्तम उपयोग कसा करावा हे ठरवणे.
2. **जलस्रोतांचे संरक्षण:** जलस्रोतांचे शाश्वतपणे संरक्षण करणे, जेणेकरून ते प्रदूषणमुक्त व दीर्घकालीन उपयोगासाठी उपलब्ध राहतील.
3. **जल वितरण:** जलाचा योग्य प्रमाणात आणि समर्पक ठिकाणी वितरण करणे, ज्यामुळे सर्व समुदायांना समानपणे जल मिळवता येईल.
4. **वाढत्या लोकसंख्येचा विचार:** जल व्यवस्थापनाची योजना तयार करताना लोकसंख्येच्या वाढीचा आणि त्यासंबंधित पाणीवापराच्या गरजांचा विचार करणे.
5. **जलसुरक्षेची योजना:** अवर्षण, पूर किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे जलस्रोतांवर होणारे परिणाम कमी करण्यासाठी धोरणात्मक उपाय तयार करणे.

यात शाश्वत विकास, सामाजिक समानता, आणि पर्यावरणीय संतुलन जपणे हे देखील महत्वाचे घटक आहेत.

**बाबासाहेबांचे जलधोरण किंवा जल व्यवस्थापन विषयक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचे शिल्पकार होते. कायदा, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि राज्यशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी बहुमोल कामगिरी बजावली आहे. मात्र, देशाच्या आर्थिक आणि जलधोरणातही त्यांची मोठी भूमिका होती, हे फार कमी लोकांना माहिती आहे. देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुंड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय व महत्तवपूर्ण आहे. यासाठी पाण्यासंबंधी आंतरराज्य समस्या उद्भवू नये म्हणून घटनेतच तरतुदी करुन ठेवल्या आहेत. 20 जुलै, 1942 रोजी डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉइसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, सिंचन व वीज हे विभाग सोपवण्यात आले. दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक आर्थिक विकासाचे धेरण आणि सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. 1935च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन आणि वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरवले. त्यामध्ये एकापेक्षा दोन राज्यांत वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे, राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत उर्जा संपत्ती निश्चित करणे आणि शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय सिंचन धोरण काय असावे या गोष्टींचा समावेश होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या जल धोरणाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.त्यांच्या कार्यामुळे, देशात जलसंपत्तीच्या वापराचे नियोजन, व्यवस्थापन आणि विकास करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या. त्यांचे मुख्य योगदान खालीलप्रमाणे आहे:-

**१) केंद्रीय जल आयोगाची स्थापना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केंद्रीय जल आयोग (CWC) ची संकल्पना मांडली. ही एक प्रमुख संघटना आहे जी नदी प्रणालींचे नियोजन, जलसंपत्तीचा योग्य वापर आणि सिंचन प्रकल्पांचे नियोजन करते.

**२) दामोदर खोरे प्रकल्प**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "दामोदर खोरे प्रकल्प" हा भारतातील एक महत्त्वाचा विकास प्रकल्प होता,जो त्यांच्या नियोजन दृष्टिकोनाचा एक महत्त्वाचा भाग होता. दामोदर नदी आणि तिच्या उपनद्यांमुळे बिहार आणि


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

पश्चिम बंगाल राज्यांच्या काही भागात वारंवार पूर येत असे. ही समस्या सोडवण्यासाठी आंबेडकरांनी "दामोदर खोरे महामंडळ" (DVC) स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. १९४४ मध्ये केंद्रीय जल आणि वीज समितीचे प्रमुख म्हणून काम करताना आंबेडकरांनी दामोदर नदीवर आधारित अनेक उद्दिष्टांसाठी एक व्यापक योजना तयार केली. या प्रकल्पाच्या माध्यमातून पूरनियंत्रण,वीजनिर्मिती,सिंचन,मत्स्यपालन आणि जलवाहतूक,औद्योगिक विकास, कृषीसुधारणा आणि जलसंपत्तीचा शाश्वत वापर यावर भर देत आंबेडकरांनी या प्रकल्पाकडे समग्र दृष्टिकोन स्वीकारला. दामोदर प्रकल्प हा भारताच्या औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील मोठ्या बदलांचे प्रतीक म्हणून पाहिला जातो.

**३) हिराकुंड प्रकल्प**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिराकुंड प्रकल्प हा एक महत्त्वाचा उपक्रम होता. त्यांनी भारताच्या जलसंपत्तीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ ते १९४६ दरम्यान ब्रिटिश भारतीय सरकारमध्ये कामगार मंत्री म्हणून काम केले. या काळात त्यांनी पाणी व्यवस्थापन, जलसंधारण आणि मोठे धरण प्रकल्प यावर भर दिला. हिराकुंड धरण हा महानदी नदीवर बांधलेला एक मोठा जलसंधारण प्रकल्प आहे, जो ओडिशा राज्यात आहे. त्याचा उद्देश शेतीच्या जमिनींची सिंचन व्यवस्था सुधारणे, पूर नियंत्रित करणे आणि वीज निर्मिती करणे हा होता. पाण्याच्या वापराचे नियोजन आणि मोठी धरणे बांधण्यात आंबेडकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली,ज्यामुळे देशाचा औद्योगिक आणि कृषी विकास झाला. डॉ. आंबेडकरांनी भारताच्या जल धोरणासाठी दीर्घकालीन योजना आखल्या, ज्यात जलसंपत्ती नियोजन, सिंचन प्रकल्प आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यावर भर देण्यात आला. हिराकुंड प्रकल्प हा बाबासाहेब आंबेडकरांनी जलसंपत्तीच्या विकासासाठी दाखवलेल्या दृष्टिकोनातील एक महत्त्वाचा टप्पा होता. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४५ मध्ये केंद्रीय जलमार्ग, सिंचन आणि नेव्हिगेशन कमिशन (CWINC) ची स्थापना केली. ही संस्था मोठ्या जल व्यवस्थापन योजना तयार करण्यास मदत करण्यासाठी होती आणि त्याचाच एक भाग म्हणून हिरकुंड धरण प्रकल्पाची योजना आखण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी या प्रकल्पाला प्रारंभिक मान्यता दिली, ज्यामुळे भारताच्या जल व्यवस्थापन आणि सिंचन प्रकल्पांच्या सुरुवातीस एक ठोस दिशा मिळाली. त्यांचा उद्देश केवळ सिंचनासाठी नव्हता तर शेती उत्पादन वाढवणे, वीज निर्मिती करणे, पूर नियंत्रित करणे आणि पाण्याचा योग्य वापर करून जलवाहतूक सुधारणे हा देखील होता. महानदीवरील हिरकुंड धरण प्रकल्प हा जगातील सर्वात लांब धरणांपैकी एक आहे, ज्याची लांबी सुमारे २५ किलोमीटर आहे. या धरणामुळे लाखो हेक्टर शेतीयोग्य जमीन सिंचनाखाली आली आणि मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती शक्य झाली. यामुळे ओडिशा आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रांचा वेगाने विकास झाला. डॉ. आंबेडकरांनी जलसंपत्तीच्या प्रभावी आणि शाश्वत व्यवस्थापनाला प्राधान्य दिले आणि त्यांनी अशा प्रकल्पांना राष्ट्रीय महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टिकोनाने भारताच्या जल धोरणाचे भविष्य घडवले आणि आधुनिक भारताच्या औद्योगिक आणि कृषी विकासाचा पाया घातला.

**४) सोन आणि कोसी नदी प्रकल्प:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या जलसंपत्तीचे महत्त्व अभ्यासून जल व्यवस्थापनाबाबत त्यांनी धरणे, जलाशय आणि कालवे यासाठी मोठ्या प्रकल्पांवर भर दिला.विशेषतः सोन आणि कोसी धरणांबद्दल, त्यांनी या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**Journal of East-West Thought**
**ISSN:** ***2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2**
**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

नद्यांचे पाणी शेती, जलविद्युत निर्मिती आणि पूर नियंत्रणासाठी कसे वापरले जाऊ शकते यावर चर्चा केली. सोन धरण हा सोन नदीच्या पाणी व्यवस्थापनावर आधारित हा प्रकल्प बाबासाहेबांच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचा होता. त्यांनी या धरणाद्वारे सिंचन सुलभ करून शेतीला पाणी पुरवण्यावर भर दिला. कोसी नदी ही बिहारमधील सर्वात पूरप्रवण नद्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोसी नदीवर धरण बांधण्याची कल्पना मांडली, जेणेकरून धरणाचा वापर पूर नियंत्रण, सिंचन आणि जलविद्युत यासाठी करता येईल. त्यांनी स्पष्ट केले होते की कोसी धरण बिहारमधील पूर परिस्थिती नियंत्रित करेल आणि त्या भागातील शेती सुधारेल.

**५) नदीजोड प्रकल्पांना पार्ठिंबा**

सध्याच्या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाची कल्पना बाबासाहेबांनी 1942 ते 1945 दरम्यान मांडली होती.डॉ. आंबेडकरांनी भारतातील नद्यांना जोडण्याची संकल्पना मांडली जेणेकरून जलसंपत्ती आणि सिंचन प्रणालींचे चांगले वितरण होईल.

**६) सिंचन प्रकल्प आणि कृषी सुधारणा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध नदी जोड प्रकल्पांच्या साह्याने सिंचन प्रणालींचा वापर वाढवून कृषी क्षेत्राचा विकास कसा करता येईल यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच कृषी विकासात राष्ट्रीय सिंचन धोरणाचे महत्त्व सुद्धा बाबासाहेबांनी पटवून दिले.

**बाबासाहेबांचा जलव्यवस्थापन विषयीचा कायदेशीर व धोरणात्मक दृष्टिकोन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार होते आणि त्यांनी भारतीय संविधानाद्वारे देशात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संविधानाच्या विविध घटकांबद्दल त्यांचे विचार स्पष्ट आहेत. राज्यांमधील जल व्यवस्थापन, विशेषतः नदी पाण्याचे वाटप आणि त्या संदर्भात व्यवस्थापन यावरही त्यांचे महत्त्वाचे विचार होते.

**१. नद्यांचे राष्ट्रीयीकरण**

डॉ. आंबेडकरांचा असा विचार होता की भारतातील प्रमुख नद्यांचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे. ते म्हणाले की नदीचे पाणी ही एक राष्ट्रीय संपत्ती आहे आणि राष्ट्रीय पातळीवर तिचा वापर संतुलित आणि समान पद्धतीने केला पाहिजे. त्यांची विचारसरणी या वस्तुस्थितीत रुजलेली होती की एक राज्य दुसऱ्या राज्याला पाणीपुरवठा थांबवून विकास रोखू शकत नाही. सर्व राज्यांना विकासाची समान संधी ही उपलब्ध व्हायला पाहिजे जेणेकरून आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी होऊन देशाच्या विकासाचा हातभार लागेल त्यांची मूळ कल्पना होती.

**२.जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन**

डॉ. आंबेडकरांचा असा विश्वास होता की, देशाच्या जलसंपत्तीचे योग्य आणि शाश्वत व्यवस्थापन केले पाहिजे. नदीचे पाणी आणि जलसंपत्तीचे राज्यांमध्ये योग्यरित्या वाटप केले पाहिजे जेणेकरून सर्व राज्ये त्यांच्या विकासात्मक गरजा पूर्ण करू शकतील.

**३.राज्यांमधील समन्वय**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा विश्वास होता की, नदीच्या पाण्याचे वाटप करताना राज्यांमध्ये समन्वय असावा. त्यांनी असे सुचवले की नदीच्या पाण्याच्या वाटपाचा अंतिम निर्णय केंद्र सरकारने घ्यावा, जेणेकरून कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही.

**४. घटनात्मक तरतुदी**

भारतीय संविधानात राज्यांमध्ये नदीच्या पाण्याच्या वाटपावर काही महत्त्वाच्या तरतुदी आहेत. डॉ. बाबासाहेबांची यात प्रमुख भूमिका होती ती आपल्याला पुढील प्रमाणे सांगता येईल.

**अनुच्छेद २६२:** या कलमानुसार, केंद्र सरकारला दोन किंवा अधिक राज्यांमधील पाणीवाटपाचे वाद सोडवण्याचा अधिकार आहे. हे आंबेडकरांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब होते, ज्यामुळे राज्यात नदीचे पाणी व्यवस्थापन सुलभ झाले.

**आंतरराज्यीय पाणी तंटे न्यायाधिकरण**: घटनेत नदीच्या पाण्याच्या वादांसाठी विशेष न्यायाधिकरण स्थापन करण्याची तरतूद आहे. यामुळे, कोणतेही वाद सोडवण्यासाठी न्यायाधीश निर्णय घेतात.

**५. जल धोरण आणि आंबेडकर**

डॉ. आंबेडकर हे जल धोरणाचे अग्रेसर विचारवंत देखील होते. त्यांनी विविध सिंचन प्रकल्पांना पाठिंबा दिला आणि देशात शेती आणि औद्योगिकीकरणासाठी पाण्याचा योग्य वापर सुचवला. त्यांच्या दृष्टिकोनातून, देशाच्या प्रगतीसाठी जलसंपत्तीचा संतुलित विकास आवश्यक आहे. यामुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यांमधील नदीच्या पाण्याच्या वापराबाबतच्या वादांवर एक संवैधानिक तोडगा प्रस्तावित केला, ज्यामुळे देशातील सर्व राज्यांना पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित होईल आणि विकासाच्या प्रक्रियेत समानता राखली जाईल.

**उपाययोजना**

भारतातील जल व्यवस्थापनासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत:

**1.जल संचयन आणि पुनर्वापर:** जलाच्या वाया जाणाऱ्या प्रमाणात कमी करण्यासाठी जल संचयनाचे महत्व मोठे आहे. पाऊस पाणी संकलन (रेनवॉटर हार्वेस्टिंग) आणि जल पुनर्वापरावर जोर दिला पाहिजे. यासाठी विविध उपाय जसे की जलाशय, तलाव आणि बंधारे यांचा वापर करणे गरजेचे आहे.

**2.जल शाश्वत वापर:** जलाची कार्यक्षमतेने आणि शाश्वतपणे वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी कृषी क्षेत्रात पाणी वाचविणारे तंत्रज्ञान जसे कि ड्रिप इरिगेशन आणि स्प्रिंकलर सिस्टिम लागू करणे महत्त्वाचे आहे.

**3 सार्वजनिक जलस्रोतांचे संरक्षण:** जलस्रोतांचे प्रदूषण आणि नासमझ वापर थांबविणे आवश्यक आहे. यासाठी कायदेशीर उपाय आणि कडक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती मोहिमा, प्रदूषण नियंत्रण कायदे, आणि नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे.

**4.जल वितरण प्रणालीचा सुधारणा:** जल वितरण प्रणालीमध्ये गळती आणि अपव्यय थांबविणे आवश्यक आहे. जलपुरवठा योजनांमध्ये सुधारणा, जल वितरणाच्या योग्य तंत्रज्ञानाचा वापर आणि नेटवर्कचे पुनर्निर्माण आवश्यक आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2**
**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

**5.समाजातील सहभाग आणि जनजागृती:** जल व्यवस्थापनाच्या यशस्वीतेसाठी लोकांना या विषयावर शिक्षित करणे आवश्यक आहे. शालेय वयाच्या मुलांपासून ते वृद्धांपर्यंत जनजागृती कॅम्पेन्स, कार्यशाळा, आणि माध्यमांच्या माध्यमातून जागरूकता वाढवणे आवश्यक आहे.

**6.जल धोरण आणि कायदेशीर उपाय:** सरकारने जल व्यवस्थापनासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये जलसंवर्धनासाठी विशेष कायदे, जल वितरणाचा समान अधिकार, आणि जलप्रदूषण थांबवण्यासाठी कठोर उपाय समाविष्ट असावेत.

**7.जलस्रोत पुनर्जीवन:** अनेक जलस्रोत कमी होण्यास किंवा नष्ट होण्यास आले आहेत. त्यांना पुनर्जीवित करणे आणि जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, नद्या, तलाव आणि जलाशयांचे पुनर्निर्माण.

**8.वाढत्या पाणीवापराचा नियंत्रण:** भारतामध्ये लोकसंख्या आणि पाणीवापरात मोठा वाढ झालेला आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील जलवापराचा प्रभावी व्यवस्थापन आणि नियंत्रण करणे आवश्यक आहे.

**9.जल प्रबंधनासाठी तंत्रज्ञानाचा वापर:** जल व्यवस्थापनाचे सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. जल पातळी मोजण्यासाठी सॅटेलाइट तंत्रज्ञान, स्मार्ट मीटरिंग, जल प्रवाह मोजणी तंत्रज्ञान याचा समावेश करणे महत्त्वाचे आहे.

**10.** भारतातील कोरडवाहू शेती ही ओलिताखाली आणण्यासाठी धरणे, नदीजोड प्रकल्प आणि कालव्यांमध्ये गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे.

**11.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे, नदीजोड प्रकल्प राबविणे आवश्यक आहे जेणेकरून उत्तर भारतात उन्हाळयात नद्यांना पूर येतो तर मध्य भारतात दुष्काळाची परिस्थिती असते. म्हणून सदर परिस्थितीत मध्ये समन्वय साधण्यासाठी उत्तर भारतातील नद्या व मध्य भारतातील नद्या या प्रकल्पाच्या माध्यमातून गेल्या तर परिस्थिती योग्य प्रकारे हाताळता येईल.

**12.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जलसंपत्तीचा समान वापर आणि लोकसंख्येच्या विविध भागांना त्याचे समन्यायी वितरण यावर भर दिला. सध्याच्या काळात, वाढत्या लोकसंख्येमुळे आणि जलसंपत्तीवरील ताणामुळे पाण्याचे समतोल वितरण करणे आवश्यक आहे.

**13.** डॉ. आंबेडकर म्हणाले होते की आंतरराज्यीय वाद टाळण्यासाठी नद्यांवरचा अधिकार केंद्र सरकारकडे असावा. आज अनेक राज्यांमध्ये पाण्याच्या हक्कांवरून वाद होतात. या मुद्द्यावर एकात्मिक राष्ट्रीय धोरणाची आवश्यकता

**14.** सध्याच्या काळात,शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे, जलसंपत्तीवरील ताण वाढला आहे, म्हणून जल कार्यक्रमाचा वापर करणे आवश्यक आहे.

भारतात जल व्यवस्थापनाच्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी एकत्रितपणे आणि समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. सर्व स्तरावर जल संसाधनांची शाश्वत वापर, संरक्षण, पुनर्वापर आणि जनजागृती यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.


**Copyright © | JET Network, All Rights Reserved**

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**समारोप**

भारत हा एक विकसनशील व कृषिप्रधान देश आहे.अधिकांश भारतीय लोक कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे.कृषीक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.म्हणूनच कृषी क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय पर्यायाने देशाचा विकास साधणार नाही याची जाणीव डॉ.आंबेडकरांना नक्कीच होती.म्हणून वाढीव कृषी उत्पादनासाठी आवश्यक घटकाची सुविधा विशेषतः पाण्याची तितकीच आवश्यक गरज होती.त्या अनुषंगाने कृषी क्षेत्राचा विचार करताना डॉ.आंबेडकर यांनी पाणी व सिंचनाचे नियोजन कसे करावे यासाठी जल व्यवस्थापन व शेती विकासासाठी पूरक असा आराखडा तयार केला होता.तसेच त्यांनी नदीजोड प्रकल्प व धरणं निर्मितीवर सुद्धा तितकाच भर दिला होता.म्हणून आज देशात पाण्याचे जे नियोजन दिसते आहे तसेच नद्याजोड प्रकल्प व धरण निर्मिती बाबत जे धोरण अवलंबिले जाते त्याची मुहूर्तमेढ डॉ.आंबेडकरांनी त्यांच्या मंत्री पदाच्या कार्यकाळात तेव्हाच रोवली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला जल व्यवस्थापनाचा विचार आजच्या काळात महत्त्वाचा आहे. त्यांनी सुचवलेले नद्या जोडणी प्रकल्प आणि जलसंपत्तीचे राष्ट्रीयीकरण यासारखे विचार सध्याच्या पाणीटंचाईच्या परिस्थितीत लागू होतात. परंतु आज भारतातील जल व्यवस्थापनात काही गंभीर आव्हाने आहेत, ज्यासाठी अधिक व्यापक आणि समन्वित प्रयत्नांची आवश्यकता आहे. जलसंपत्तीचे समतोल वाटप, प्रभावी जलसंवर्धन उपाययोजना आणि जल प्रदूषणावर नियंत्रण हे भारतातील भविष्यातील जल व्यवस्थापनाचे प्रमुख मुद्दे असतील. गंभीर आव्हानांवर मात करण्यासाठी आंबेडकरांच्या विचारांवर आधारित व्यापक पाणी धोरणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. यामुळे जलसंपत्तीचे समतोल वितरण आणि शाश्वत वापर सुनिश्चित होईल.

**संदर्भ**

1. पाटील वा. भा.(2010), ‘संशोधन पद्धती’, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
2. सुखदेव थोरात (1998), ‘आंबेडकर रोल इन इकॉनोमिक प्लॅनिंग अँड वॉटर पॉलिसी’, शिप्रा पब्लिकेशन, न्यू दिल्ली
3. डॉ. सुभाष (2017), ‘डॉ. आंबेडकर कॉन्ट्रीब्युशन ऑन वॉटर रिसोर्स डेव्हलपमेंट इन इंडिया’ इंडियन जनरल ऑफ अप्लाइड रिसर्च पे.नं.1-2
4. कसबे तानाजी (2018), ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार’ रिव्ह्यू ऑफ रिसर्च पे.नं. 1-7.
5. डॉ. संदीप रावल ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट्स ऑन वॉटर मॅनेजमेंट अँड द प्रेझेंट स्टेटस ऑफ वॉटर मॅनेजमेंट इन इंडिया’ एस जे आय एफ नवज्योत, पे. नं.1-9
2. https://divyamarathi.bhaskar.com
3. 6.https://www.forwardpress.in/2020/04/dr-ambedkar-pioneer-of-national-water-resources-development-policy/


Copyright © | JET Network, All Rights Reserved